सुरक्षा विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
पुणे-४११ ००७.

# जाहीर प्रकटन

दि. २७/०३/२०२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारात दि. २५/०३/२०२५ रोजी रात्री ९.१५ च्या सुमारास एका विकृत व्यक्तिने काही विद्यार्थीनींसमोर गैरप्रकार करण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार विद्यापीठास प्राप्त झाली आहे. विद्यापीठ प्रशासन याबाबत अतिशय संवेदनशील असून पूर्णपणे विद्यार्थिनींच्या पाठीशी आहे. सदर घटनेतील विकृत व्यक्तिविरुध्द विद्यापीठाने अधिकृतपणे पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदवलेला आहे. तसेच याबाबत कर्तव्यात निष्काळजीपणा करणाऱ्या व चुकीचे वर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्दही विद्यापीठ प्रशासन कायद्याप्रमाणे कडक कारवाई करत आहे. पोलीस प्रशासनानेही विद्यापीठास पूर्ण सहकार्य दिले आहे. भविष्यात अशा प्रकारच्या घटना होऊ नयेत याबाबत विद्यापीठ सर्व ती खबरदारी घेत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सुरक्षा विभाग पुणे-७.

F:\Letters 2024\66

Scanned with OKEN Scanner